६१४१ (प्रति) १

ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख ९ डिसेंबर, १९५३ | अंक ४६

## विविध माहिती

**धान्यासाठी भरावें लागलेलें व्याज**—भारतानें गहूं खरेदी करण्यासाठी अमेरिकेकडून कर्ज घेतलें होतें. ३० जून, १९५३ अखेर ह्या कर्जावर भारताला ४६,५६,७३६ डॉलर्स व्याज द्यावें लागलें, अशी माहिती भारताचे अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनीं लोकसभेंत सांगितली.

**स्टॉकहोममध्यें हिंदी बोलपट**—स्वीडनमधील चित्रपट वितरकांनीं 'आवारा' आणि 'आन' हे दोन भारतीय चित्रपट आपल्या देशांत दाखविण्यासाठी मागितले आहेत. संपूर्ण भारतीय चित्रपट स्वीडनमध्यें दाखविले जाण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. 'आवारा' चित्रपट खास पाहुण्यांना लवकरच दाखविण्यांत येणार आहे.

**रशिआची सोन्याची विक्री**—सोव्हिएट रशिआनें १७ टन सोनें विमानानें लंडनला धाडलें आहे. सोन्याची वहातूक करण्यासाठी तीन विमानें लागलीं आणि तें सोनें विमानतळावरून तावडतोब बँक ऑफ इंग्लंडकडे रवाना करण्यांत आलें. सोनें, चांदी व इतर धातूहि रशिआनें युरोपिअन बाजारांत विकावयास काढल्याचें वृत्त आहे.

**जागतिक उत्पन्नांत अमेरिकेचा वाटा**—१९२६ मध्यें जगाच्या एकूण उत्पन्नापैकीं २६ टक्के वाटा अमेरिकेचा होता. आतां ह्या वाट्याचें प्रमाण ४० टक्के झालें आहे. १९३८ सालीं अमेरिकेचें दरमाणशीं उत्पन्न ५४५ पौंड, कॅनडाचें ३२० पौंड, ब्रिटनचें २७८ पौंड, रशिआचें ६५ पौंड आणि इटलीचें ८० पौंड होतें.

**उत्तर प्रदेशमधील मासळीचें उत्पादन**—उत्तर प्रदेशांतील मासळीचें उत्पादन वाढविण्यासाठी मिर्झापूर येथें एक संशोधन-केंद्र कार्य करीत असतें. संशोधनांत असें आढळून आलें कीं, कांहीं विशिष्ट जातीच्या माशांची उत्पत्ति खूप वाढवितां येण्यासारखी आहे. मुंबईहून उत्तर प्रदेशांत आणलेल्या एका जातीच्या माशांचीहि भरपूर पैदास होते, असें दिसून आलें आहे.

**बँकेला परवाना नाकारला**—प. बंगालमधील बोग्रा बँकर्स अँड ट्रेडर्स कॉर्पोरेशन ह्या संस्थेला बँकिंगचे व्यवहार करण्याचा परवाना देण्याचें रिझर्व्ह बँकेनें नाकारलें आहे. परवाना नाकारल्यामुळें बँकेला हा धंदा करतां येणार नाहीं आणि लोकांकडून ठेवीहि घेतां येणार नाहींत.

**जगांतील सर्वांत अधिक उंचीवरील टेलिग्राफ कचेरी**—भारतीय टेलिग्राफ खात्यानें जगांत सर्वांत अधिक उंचीवर असलेलें टेलिग्राफ ऑफिस चालविलेलें आहे. ही कचेरी भूतांग येथें असून तिची समुद्र-सपाटीपासून उंची १३,५०० फूट आहे.

**म्हैसूर राज्याला कर्ज**—भारत सरकारनें म्हैसूरच्या सरकारला अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेला मदत म्हणून २·५ लाख रुपये कर्ज मंजूर केलें आहे. ह्या कर्जाचा उपयोग शेतकऱ्यांना यंत्रचलित नांगर घेऊन देण्यासाठीं करण्यांत यावयाचा आहे. कर्ज देण्याची एक योजना आंखण्यांत आली असून तीबरहुकूम एका शेतकऱ्याला ट्रॅक्टर व इतर अवजारें विकत घेण्यासाठी जास्तींत जास्त १२,००० रुपये मिळतील.

**आसाममधील नारळाची लागवड**—१९५१ च्या ऑक्टोबर महिन्यापासून आसाम राज्यांत नारळाची लागवड करण्यास प्रारंभ झाला. नारळाच्या लागवडीची ही योजना इंडियन सेंट्रल कोकोनट कमिटी आणि आसाम सरकार ह्यांनीं पुरस्कार केलेली आहे. योजनेप्रमाणें १९५२-५३ सालीं नारळाचीं १,५०,०० रोपें लावण्यासाठी लोकांना देण्यांत आलीं. ४,००० रोपें वनस्पति-शाळेंतच ठेवण्यांत आलीं. चालू वर्षी आणखी रोपें लोकांना देण्यांत येणार आहेत.

**"अर्थशास्त्रा"चें रशिअन भाषांतर**—कौटिलीय अर्थशास्त्र ह्या २,००० वर्षांपूर्वीच्या अर्थविषयक ग्रंथाचें भाषांतर रशिअन भाषेंत करण्यांत आलें आहे. रशिआंतील ओरिएंटल इन्स्टिट्यूट ऑफ दि अॅकेडमी ऑफ सायन्सेस ह्या संस्थेतर्फे पौर्वात्य देशांतील पुस्तकांचीं भाषांतरें प्रसिद्ध करण्यांत येत असतात. ही संस्था आतां रशिअन-हिंदी व रशिअन-उर्दू असे दोन शब्दकोश तयार करीत आहे. प्रत्येक कोशांत ५०,००० शब्द असतील.

**७०० वर्षांपूर्वीचे कायदे**—ब्रिटिश पार्लमेंटपुढें मांडण्यांत येणाऱ्या एका बिलान्वयें ४०० जुनेपुराणे कायदे रद्द करण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं कांहीं कायदे ७०० वर्षांचे जुने आहेत. पार्लमेंटचे सभासद निवडतांना लांचलुचपत होऊं नये म्हणून मंजूर करण्यांत आलेला एक कायदाहि त्यांत आहे. मतदानाचा हक्क मर्यादित होता त्यावेळीं सदर कायदा मंजूर झालेला आहे.

**बडोदा भागांत युरेनिअमचा आढळ**—बडोदा भागांतील छोटा उदेपूर तालुक्यांतील एका खाणींत युरेनिअममिश्रित माती सांपडल्याचें वृत्त आहे. सध्या ह्या खाणी एका खाजगी कंपनीच्या ताब्यांत असून तींत सांपडणाऱ्या धातूंची पाहणी करण्याचें काम भारतीय सरकारचे भूस्तरशास्त्रज्ञ करीत आहेत.

**हिंदी लष्करासाठी अमेरिकन रणगाडे**—हिंदी लष्करासाठी भारतीय सरकारनें मागविलेले ३० रणगाडे मुंबई बंदरांत आले आहेत. ते 'शेरमन' जातीचे असून त्यांचें वजन प्रत्येकीं ३१ टन आहे. ज्या बोटींतून हे रणगाडे आणण्यांत आले, त्याच बोटींतून ८,५०० टन मायलोहि आयात करण्यांत आलें.

**जेट विमानांची मागणी**—विमानांच्या ब्रिटिश कारखानदारांकडे जेटवर चालणाऱ्या प्रवासी विमानांच्या मागण्या मोठ्या प्रमाणावर करण्यांत येत आहेत. १२ निरनिराळ्या देशांतील १८ वैमानिक प्रवासी कंपन्यांनीं मिळून ६.६ कोटी पौंड किंमतीच्या विमानांच्या मागण्या नोंदविल्या आहेत. भारतानेंहि जेट विमानांच्या मागण्या नोंदविल्या आहेत.

**'वहिनीच्या बांगड्यां'चा तामिळी अवतार**—'वहिनीच्या बांगड्या' ह्या यशस्वी मराठी बोलपटाची तामीळ आवृत्ति काढण्याचें ठरलें आहे, असें समजतें. तामीळ भाषिक चित्रपटांत थोडासा बदल करण्यांत येणार आहे. सर्वच्या सर्व संभाषण न देतां प्रथम गोष्टीचा सारांश देण्यांत येणार आहे, आणि ज्या ठिकाणीं संभाषणें नसतील त्या ठिकाणीं निवेदन करण्यांत येणार आहे. मूळ मराठी चित्रपट जसाचा तसाच बंगालमध्यें दाखविण्याचीहि योजना आहे.

**लडाकमध्यें इस्पितळ**—काश्मीरच्या उत्तरेला असलेल्या लडाक ह्या लष्करी दृष्टीनें महत्त्वाच्या असलेल्या प्रदेशांत पहिलेंच आधुनिक तऱ्हेचें इस्पितळ बांधण्यांत येणार आहे. इस्पितळांत २० खाटा ठेवण्यांत येणार आहेत. लडाकची राजधानी लेह येथें तें बांधण्यांत येत असून ३० हजार चौरस मैल प्रदेशांतील लोकांची त्यामुळें सोय होईल.

**मद्रास राज्यांतील शिक्षण**—मद्रास राज्यांतील मूलोद्योग शिक्षणासाठी वापरण्यांत येणारा अभ्यासक्रम तपासून पाहून त्याचा राज्यांतील दुय्यम शिक्षणाशीं मेळ घालण्यासाठी मद्रास सरकारनें खास तपासनीस नेमण्याचें ठरविलें आहे.

**बंगाल सरकारचें पीडितांना साह्य**—बंगालमधील पूरपीडितांना व इतर गरजू लोकांना साह्य करण्यासाठीं बंगाल सरकारनें चालू फडणिशी वर्षांत आतांपर्यंत १,७६,७७,८१४ रुपये खर्च केले आहेत.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

॥ परि हें मियां केलें । की हें माझेनि सिद्धी गेलें ।
॥ ऐसें नाहीं ठेविलें । वासने माजी ॥ १३–५२७ ज्ञानेश्वरी

**"माझेनि सिद्धी गेलें" हें वासनेंत सुद्धां न ठेवल्यामुळें नवीन हंगामाची साखर करण्यास सुरुवात झाली.**

(१) साखरेच्या धंद्यांत १० टक्के नफा हा अनुभव.
(२) सिंडिकेटचें साखरेचें उत्पादन कायमचें वाढलेलें.
(३) ६ ते ७ टक्के व्याजानें ठेवी सुरक्षित.
(४) कोणाहि ठेवीदाराची ठेव बुडाली नाहीं.

—★ कार्यक्रम ★—

—नवीन हंगामाच्या साखरविक्रींतून—

"सेव्हिंग बँकेचा दीड टक्का बरा" अशा मताच्या

★ ठेवीदारांच्या ठेवी परत करणें ★

— साखरविक्रीवर सरकारी नियंत्रण असेपर्यंत —

= बँकांचें कॅश क्रेडिट किंवा ठेवी घ्याव्या लागतील. =

**ठेवींचे व्याजाचे दर**

★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ (सात) टक्के.
★ मुदत एक वर्ष — व्याज ६ (सहा) टक्के.

ठेवींचे फॉर्म पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० सदाशिव पेठ, पुणें २.
दि. २५-११-१९५३

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. ९ डिसेंबर १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## नवा कंपनी कायदा

### पार्श्वभूमि आणि तरतुदींची बैठक

२ सप्टेंबर, १९५३ रोजीं अर्थमंत्री श्री. देशमुख ह्यांनीं कंपनी कायद्याबाबत एक विस्तृत बिल पार्लमेंटांत मांडलें. भारतांतील पहिला कंपनी कायदा १८५० मध्यें झाला व त्यांतूनच पुढें इतर कायदे निर्माण झाले. १९३६ मध्यें कंपनी कायद्यांत बऱ्याच सुधारणा करण्यांत आल्या. दुसऱ्या महायुद्धानंतर आणखी बऱ्याच सुधारणांची आवश्यकता स्पष्ट झाली. जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या घटनांत व व्यवस्थेंत कित्येक फरक घडून आले होते आणि उद्योगधंद्यांत पडलेल्या युद्धजन्य नव्या धनिकांच्या वर्चस्वाखालीं कंपन्यांची कारभारपद्धतीहि बदललीं होती. ग्रेट ब्रिटनमध्यें कोहेन कमिटीनें परिश्रमपूर्वक आपला कंपनी कायद्याबाबतचा अहवाल सादर केला होता व त्यांत कमिटीनें ग्रेट ब्रिटनमधील कंपनी कायद्यांत दूरगामी सुधारणा सुचविल्या होत्या. चालू इंग्रजी कायद्यावरच हिंदी कंपनी कायदा आधारला जात असल्यानें, त्यावेळच्या भारतीय सरकारासहि हिंदी कंपनी कायद्याचा आढावा घेणें जरूर वाटलें. ह्या कायद्यांत कोणत्या तत्त्वावर सुधारणा करण्यांत यावी, हें सुचविण्यासाठीं सरकारनें एकामागाहून एक अशा दोन तज्ज्ञांची नेमणूक केली. त्यांच्या शिफारशींची सरकारच्या व्यापारखात्यानें छाननी केली. खात्याचें मत लोकांच्या अभिप्रायासाठीं प्रसिद्ध करण्यांत आलें. १९५० अखेर सरकारनें श्री. सी. एच. भाभा ह्यांच्या अध्यक्षतेखालीं हिंदी कंपनी कायद्याची दुरुस्ती सुचविण्यासाठीं एक कमिटी नेमली; हिंदी व्यापार व उद्योग ह्यांच्या वाढीस पोषक होईल, अशी दुरुस्ती कमिटीनें सुचविण्याची होती. कमिटीनें मार्च, १९५२ मध्यें आपला अहवाल सादर केला. ह्या अहवालावरील व्यापारी प्रातिनिधिक संस्थांचीं मतें लक्षांत घेऊन प्रस्तुत बिल तयार करण्यांत आलें आहे.

भाभा कमिटीच्या शिफारसी ज्या तत्त्वांवर आधारलेल्या होत्या, त्यांतील मुख्य येथें देण्यांत येत आहेत. कंपनीची उभारणी व तिचा कारभार ह्याबाबत वागणुकीची किमान मातळी तरी रहावी ह्या दृष्टीनें कायद्याची तरतूद असावी; तथापि सच्चा व्यवहार किंवा पुढाकार किंवा नव्या व्यवसायाची उभारणी ह्यांस आळा बसेल असे जाचक नियम मात्र असूं नयेत. कंपनीच्या प्रॉस्पेक्टस मध्यें भरपूर तपशील दिला जावा, अशी कायदेशीर तरतूद करण्यांत यावी. असा तपशील दिला गेला नाहीं तर त्याला कडक शासन व्हावें. कंपनीचा कारभार जसा चालला असेल, तसा तो समजावा ह्या दृष्टीनें कंपनीचे हिशेब तयार करण्यांत यावे, म्हणजे कंपनीचा कारभार स्पष्ट लक्षांत येऊं शकेल. कंपनीच्या सभा अशा रीतीनें बोलाविण्यांत आणि चालविण्यांत याव्या, कीं ज्यामुळें तिच्या कारभारावर योग्य मत व्यक्त करण्यास भागीदारांना इष्ट ती संधि व सवलत मिळावी. जेव्हां एखादा गुन्हा घडला असेल, अशाच वेळीं केवळ नव्हे, तर जेव्हां कंपनीचा कारभार भागीदारांच्या हिताच्या दृष्टीनें चालविलेला नाहीं असें आढळतें किंवा सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें जरूर असेल तरीहि कंपनीच्या कारभाराची चौकशी करतां यावी व तिच्यांत हस्तक्षेप करतां यावा, अशी कायद्याची तरतूद असावी. कंपनी कायद्याच्या तरतुदींची अंमलबजावणी करणें, कायद्याप्रमाणें योग्य त्या चौकशा करणें आणि जरूरीच्या वेळीं खास अधिकारांचा वापर करणें, ह्यासाठीं कायद्यांत व्यवस्था असावी. ह्या सर्व तत्त्वांस धरूनच कंपनी कायद्याचें बिल तयार करण्यांत आलें आहे. फक्त कांहीं किरकोळ बाबतींतच भाभा कमिटीच्या शिफारशींचा बिलांत अंतर्भाव करण्यांत आलेला नाहीं. त्याचप्रमाणें, एकदोन नवीन तरतुदीहि बिलांत सामील करण्यांत आलेल्या आहेत. १९१३ च्या मूळ कायद्यांतील कलमांचा अनुक्रम आतां नीट लावण्यांत आला आहे. कंपनीची स्थापना, वाढ व विसर्जन ह्या अनुक्रमानें कलमें तयार केलीं आहेत, त्यामुळें नव्या बिलांत बरेच आमूलाग्र फरक झालेले आहेत. तथापि, त्यामुळें कंपनी कायद्याचें आकलन अधिक चांगलें होईल अशी अपेक्षा आहे.

---

### जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स लि.

वरील कंपनीनें ३० जून अखेरच्या वर्षी ५,५९,०१० रु. किंमतीची विक्री करून २,१४,८४६ रु. ठोक नफा मिळविला. सर्व खर्च भागवून व ४६,९६० रु. चा घसारा काढून कंपनीस ८६,२९३ रु. निव्वळ नफा झाला. गेल्या वर्षीपेक्षां विक्री पावणेदोन लक्ष रुपयांनीं कमी होऊनहि निव्वळ नफा दुपटीपेक्षा ज्यास्त झाला, ह्याचें कारण चालकांनीं खर्चाच्या सर्व बाबींत केलेली काटकसर आणि अहवालाच्या वर्षी विक्री झालेल्या बऱ्याच मशिनरीवरील झालेला खर्च गेल्या वर्षीच्या उत्पादनखर्चात मिळवला गेला होता, हें होय. त्यामुळें, कंपनी गेल्या वर्षीप्रमाणेंच डिव्हिडंड देऊं शकत आहे व नोकरवर्गास तिला बोनस देता येत आहे. प्रेफरन्स भागांस ठराविक ५% व ऑर्डिनरी भागांस ६% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीचें वसूल भांडवल ७,४६,८७५ रु. असून तिचेकडे १,०६,१५० रु. च्या ठेवी आहेत. घसारा व इतर रिझर्व्हजमध्यें ५,६७,१९८ रु. आहेत. कंपनी ३,०८,११४ रु. चे सरकारी रोखे धारण करीत असून ८२,१९१ रु. रोख शिल्लक आहेत. बँकेचें कर्ज नाहीं. ह्या आढाव्यावरून, कंपनीच्या उत्कृष्ट परिस्थितीची व चालकांच्या यशस्वी कारभाराची कल्पना येईल. (चेअरमन : वा. पुं. वर्दे. मॅनेजिंग एजंटस् : मेसर्स दांडेकर इंजिनिअर्स लि. ऑ. सेक्रेटरी : वि. ज. भिडे.)

---

**भारतीय चहाची किंमत**—भारतामधील चहाच्या मळेवाल्यांनीं उत्पादन कमी करण्याचे निर्बंध स्वतःच घालून घेतल्यामुळें लंडनमधील चहाच्या पेट्यांच्या लिलावांत भारतीय चहाची किंमत बरीच चढली असल्याचें समजतें. गेल्या आठवड्यांत झालेल्या लिलावांत भारतीय चहाची किंमत दर पौंडामागें ३ शिलिंग व ६ पेन्स इतकी झाली होती.

## मुंबई राज्यांतील कोंबड्या पाळण्याचा धंदा

मुंबई राज्याच्या ग्रामीण भागांत ६१ लाख कोंबड्या असून गुजरातच्या उत्तरेकडील जिल्ह्यांखेरिज राज्यांत बहुतेक सर्व जिल्ह्यांतून कोंबड्या पाळण्याचा धंदा चालतो. मुंबई शहराला कोंबड्या व अंडीं यांचा पुरवठा मुख्यतः सोलापूर, कोल्हापूर, सातारा, बेळगांव आणि अहमदनगर हे जिल्हे व सुरत व नवसारी जिल्ह्यांच्या आसपासच्या भागांतून होतो. राज्याच्या या धंद्याचें मोठें गिऱ्हाईक मुंबई शहर हेंच असून, मुंबईची गरज भागविण्यासाठीं दररोज ३ लाख अंडीं व ३,००० कोंबड्या लागतात असा अंदाज आहे. यामुळें खेडेगांवांतील शेतकऱ्यांना वार्षिक दोन कोटी रुपयांचें उत्पन्न मिळतें. मुंबई राज्यांत सालिना १ कोटी ८० लाख रुपये किंमतीची सुमारें १८ कोटी अंड्यांची पैदास होते. कोंबड्यांच्या खुराड्यांकडे व खाण्यापिण्याकडे व्यवस्थित लक्ष न दिल्यामुळें ३० टक्के पक्षी मरण पावतात. राणीखेत सारख्या भयानक रोगानें एकाद्या दुर्दैवी शेतकऱ्याचा कोंबड्यांचा संपूर्ण कळप नाश पावतो. या रोगाची प्रतिबंधक लस तज्ज्ञांनीं शोधून काढली असून तिचे परिणाम १२ महिने टिकतात व ती जवळच्या पशुवैद्यक अधिकाऱ्याकडून मोफत मिळतें.

१९४७ सालापासून कोंबड्यांच्या पैदाशीच्या विकासाबाबतचा एक कार्यक्रम अमलांत आणण्यांत आला असून यासंबंधींचें संशोधनकार्य खडकी येथील सेंट्रल पोल्ट्री फार्ममध्यें करण्यांत येतें. याबाबत करण्यांत आलेल्या निरनिराळ्या प्रयोगांमुळें कोंबड्यांची अंडीं घालण्याची कुवत वाढली असून पक्ष्यांच्या शरीराचा आकारहि वाढला आहे. १९४३ सालापासून सोलापूर जिल्ह्यांतील पंढरपूर व सांगोलें तालुक्यांत अंडीं गोळा करण्याची योजना चालू असून त्यामुळें चांगल्या जातीच्या कोंबड्या व अंडीं गिऱ्हाइकांना देतां येतात. या भागांतून दरसाल २,७५,००० अंडीं विकण्यांत येतात, आणि या योजनेमुळें ६५ गांवांतील सुमारें ८०० शेतकऱ्यांचा फायदा झाला आहे. राज्यांतील ७३ इसमांना हा धंदा करण्यासाठीं दरसाल एकूण ९,००० रुपये देण्यांत येतात. कोंबड्यांच्या पैदाशींत सुधारणा करण्यासाठीं दरसाल सरासरीं १५,००० अंडीं व ३,५०० पक्षी पुरविण्यांत येतात या व्यवसायाचें शिक्षण घेण्यासाठीं मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना खडकी येथें दरमहा ३० रु. या प्रमाणांत शिष्यवृत्त्या देण्यांत येतात. हा अभ्यासक्रम तीन महिन्यांचा असून अशाच तऱ्हेच्या अभ्यासक्रमासाठीं धुळें व धारवाड या केंद्रांतून शिक्षण घेणाऱ्यांना द. म. २० रु. या प्रमाणांत शिष्यवृत्त्या देण्यांत येतात. या ठिकाणीं शिक्षण मोफत देण्यांत येतें. सरकारी पोल्ट्री फार्ममधून शेतकऱ्यांना पैदासीसाठीं कोंबडे व अंडीं पुरविण्यांत येतात. तसेंच या व्यवसायाचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर स्वतःचा धंदा करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना कर्जेंहि देण्यांत येतात.

---

टिटॅनिअमच्या टंचाईचा परिणाम—जनरल कर्न मेट्झर ह्या अमेरिकन हवाई अधिकाऱ्यानें अशी भीति व्यक्त केली आहे, कीं युद्ध झाल्यास तें जिंकण्यास पुरेशीं विमानें अमेरिका बांधूं शकणार नाहीं. कारण, विमानें निर्माण करण्यास लागणारें टिटॅनिअम अमेरिका मिळवूं शकत नाहीं. अमेरिकन संरक्षण खात्याच्या अंदाजाप्रमाणें, दरवर्षीं २२,००० टन टिटॅनिअमची गरज आहे.

## पौर्वात्य संस्कृतिविषयीं रशिआची आस्था

प्रो. सत्येंद्रनाथ सेन हे शास्त्रज्ञ नुकतेच रशिआचा व इतर युरोपीय देशांचा दौरा करून भारतांत परत आले आहेत. दौऱ्यांतील अनुभवाविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं रशिआंत बंगाली भाषा सहज बोलूं शकणारे बरेच लोक मला आढळले. भारत आणि इतर पौर्वात्य देश ह्यांच्या संस्कृतीविषयीं आस्था दाखविणारे रशिअन लोक पाहून मला अतिशय आश्चर्य वाटलें आणि आनंदहि झाला. भारतीय जीवनाविषयीं जीं पुस्तकें प्रसिद्ध होतात तीं वाचण्याची रशिअन लोकांना फार उत्सुकता असते. रशिआंतील शास्त्रीय संशोधनाविषयीं बोलतांना श्री. सेन म्हणाले कीं रशिआंतील शास्त्रज्ञ, राष्ट्रीय जीवनाची सर्व बाजूंनीं प्रगति साधण्याचे प्रयत्न एकदिलानें आणि सहकार्यानें करीत आहेत. त्यांनीं केलेली प्रगतीहि लक्षांत भरण्यासारखी आहे. रशिआंतील दौरा संपल्यानंतर प्रो. सेन इंग्लंड व फ्रान्स देशांचाहि प्रवास करून आले. दोन्ही देशांतील शास्त्रज्ञांशीं चर्चा करण्याची संधीहि त्यांना मिळाली. तथापि कोपनहेगन येथें पदार्थविज्ञान शास्त्र–विषयक संशोधनांत जी कामगिरी करण्यांत आली आहे तिचें त्यांना विशेष कौतुक वाटलें. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपांतील सर्वच देशांची घडी पूर्णपणें विस्कटून गेली होती. परंतु युद्ध संपून दहा वर्षे होण्याच्या आंतच बहुतेक देशांनीं स्वतःला तोल सांवरून पुन्हा प्रगति करण्यास सुरुवात केली आहे, असें दिसून येतें. प्रो. सेन ह्यांच्यासारखे शास्त्रज्ञ परदेशांतून जाऊन निरीक्षण करून आले म्हणजे ह्या राष्ट्रांच्या प्रयत्नांची अधिकृत माहिती मिळण्यास व भारतानें त्यांच्यापासून काय शिकण्यासारखें आहे तें समजण्यास मदत होते.

---

## दिल्लीमधील मध्यवर्ती सरकारचें वाचनालय

दिल्ली येथील सरकारी कचेरीचें वाचनालय आतां सर्व खात्यांतील नोकरांच्यासाठीं खुलें करण्यांत आलें आहे. वाचनालयांत १,४०,००० वर पुस्तकांचा संग्रह आहे. भारतीय सरकारच्या कचेरीशीं संबंध असणाऱ्या इतर कचेऱ्यांतील सरकारी नोकरवर्गालाहि ग्रंथालयाचा फायदा घेऊं दिला जातो. पूर्वी ह्या वाचनालयांतून पुस्तकें न्यावयाचीं झाल्यास अनामत रक्कम ठेवावी लागे. त्यामुळें व इतर नियमांमुळें वाचनालयाचे अवघे १,५०० सभासद होते. परंतु आतां त्यांची संख्या बरीच वाढली आहे. ह्या ग्रंथालयांत फोर्ट विल्यम वाचनालय आणि आणखी दोन जुन्या वाचनालयांचा समावेश करण्यांत आला आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे प्रसिद्ध होणारीं पुस्तकें ह्या वाचनालयाला मोफत मिळतात. ग्रंथ–संग्रहालयांतील पुस्तकांत पौर्वात्य देशांच्या इतिहासाचीं पुस्तकें विशेष प्रमाणांत सांपडतात. मध्य–आशिया, तिबेट, मंगोलिआ, सयाम, चीन इत्यादि देशांसंबंधींचीं बहुमोल पुस्तकें ग्रंथालयांत आहेत. त्याशिवाय १० व्या व १८ व्या शतकांतील प्रवासवृत्तहि आहेत. बडोदा, त्रिवेंद्रम, काश्मीर व इतर ठिकाणीं प्रसिद्ध झालेलीं संस्कृत पुस्तकेंहि वाचनालयांत सांपडतात. १९४९ सालीं वाचनालयाचा हिंदी विभाग खोलण्यांत आला. १९५३–५४ सालीं वाचनालयासाठीं नवीन पुस्तकें घेतां यावीं म्हणून ३५,००० रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आली आहे. ह्या रकमेंतून मुख्यतः भारतांत प्रसिद्ध होणारीं पुस्तकें घेण्यांत येणार आहेत. त्याशिवाय १० हजार रुपयांची वेगळी रक्कम परदेशीय पुस्तकांच्या खरेदीसाठीं राखून ठेवण्यांत आली आहे.

## सोलापूर डि. सें. को. बँकेची पुणें विद्यापीठास बहुमोल देणगी

### डॉ. जयकरांना दिलेली थैली

पुणें विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. जयकर ह्यांनीं २९ नोव्हेंबर रोजीं सोलापूर जिल्हा सें. को. बँकेस भेट दिली. त्यावेळीं बँकेचे चेअरमन, श्री. जी. डी. साठे, एम. एल. सी., ह्यांनीं त्यांचें स्वागत केलें. निवडक स्थानिक सहकारी कार्यकर्ते, डायरेक्टर्स व सोलापूरचे इतर निमंत्रित सन्मान्य नागरिक ह्यांच्या समेंत श्री. साठे ह्यांनीं बँकेच्या वतीनें कुलगुरूंना ५,००० रु. ची थैली अर्पण केली. बँकेच्या पूर्वीच्या नफ्यांतून ही देणगी देण्यांत आली आहे. त्याचवेळीं, बँकेनें जमविलेले १,७७५ रु. हि कुलगुरूंना देण्यांत आले. बार्शी तालुक्याच्या वतीनें बार्शी सें. को. बँकेच्या चेअरमननीं १,००० रु. ची देणगी जाहीर केली.

डॉ. जयकरांनीं देणगीचा स्वीकार करतांना, देणगीदारांच्या औदार्याबद्दल धन्योद्गार काढले. धनिकांच्या देणग्या आणि सहकारी संस्थांच्या देणग्या ह्यांतील फरक त्यांनीं स्पष्ट करून दाखवला. सहकारी बँकांच्या देणगीच्या मागें बहुसंख्य व्यक्ती व संस्था ह्यांची नव्यानें स्थापन झालेल्या पुणें विद्यापीठाबाबत शुभेच्छा असते; अशा लहान देणग्यांचेंहि महत्त्व मोठें असतें आणि सोलापूर बँकेची देणगी तर खरोखरच बहुमोल आहे, असें कुलगुरु म्हणाले. सोलापूर बँक व सोलापूर जिल्ह्यांतील सहकारी चळवळ ह्यांस त्यांनीं सुयश चिंतलें.

---

## दि बाँबे स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन

### डायरेक्टर बोर्डावर श्री. दा. वा. पोतदार

मध्यम व लहान आकाराच्या उद्योगधंद्यांना कर्जे देण्यासाठी मुंबई सरकारनें वरील कॉर्पोरेशनची स्थापना केली आहे. तिच्या डायरेक्टर बोर्डांत खालील गृहस्थ आहेतः—

श्री. पुरुषोत्तमदास कानजी (चेअरमन), श्री. डी. जी. मुल्हेरकर, डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रिज (अधिकारपरत्वें), श्री. व्ही. सुब्रम्हण्यम, आय. ए. एस., जॉइंट रजिस्ट्रार को. सोसायटीज (अधिकारपरत्वें), श्री. नवल एच. टाटा, श्री. दा. वा. पोतदार, श्री. यू. एस. देसाई, श्री. आर. जे. देशपांडे, श्री. वी. वेंकटपय्या, श्री. एस. टी. कर्णिक, श्री. आर. एस. भट्ट हे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम करतील.

---

### दि फलटण शुगर वर्क्स लि.

स्टॉक एक्सचेंजच्या नियमांप्रमाणें कंपनीचे शेअर्स शेअर-बाजारांत खरीदर्ता-विक्रर्ता यावेत ह्यासाठी दि फलटण शुगर वर्क्स लि. नें प्रत्येकी ५० रु. चा असे १२,००० शेअर्स विकण्याचें ठरविलें आहे. ५० रु. पूर्णपणें भरलेल्या शेअरची विक्रीची किंमत ९० रु. ठेवण्यांत आली. दि इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. नें ही शेअरविक्री अंडरराइट केलेली आहे. प्रस्तुत कंपनीचें सध्याचें वसूल भांडवल ५० लक्ष रु. आहे. त्यापैकी १० लक्ष रु. सुरवातीस रोखीनें विक्री करून जमा झालेलें असून बाकीचें ४० लक्ष रु. भांडवल बोनस-शेअर्सचें आहे. कंपनीचा रिझर्व्ह फंड ३६ लक्ष रु. आहे १९५२-५३ साठी १२% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे.

## कण आणि क्षण

### (सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)

-पृ. सं. १६८. किंमत २॥ रु.

"अर्थ" साप्ताहिकाचे संपादक श्री. काळे यांनीं निरनिराळ्या मासिकांत लिहिलेल्या ३० लेखांचा हा संग्रह आहे. या पुस्तकांतील लेख वाचतांना लेखकाच्या व्यवहारज्ञानाची, सूक्ष्म निरीक्षणाची व व्यापक दृष्टीची पदोपदीं प्रचीति येते. कौटुंबिक व सामाजिक जीवनास मार्गदर्शक व सुखी जीवनास पोषक अशा स्वरूपाचे हे लेख सुबोध भाषेत व रोजच्या व्यवहारांतील पटण्याजोगी उदाहरणें देऊन मोठ्या कुशलतेनें सजविले असल्यामुळें ते जसे मनोरंजक तसे उद्बोधकहि झाले आहेत. सामाजिक व्यवहारांतल्या साध्याच गोष्टी, पण त्या योग्यप्रकारें अंमलांत आणल्या तर व्यक्तींच्या व कुटुंबाच्या सुखांत भर पडल्याशिवाय रहाणार नाहीं, हे लेखकानें पाहुणचार, मिळवती स्त्री, घरगुती नोकर, पतिपत्नींचे संबंध, सास्वा-सुना, म्हातारपण, काळ आणि वेळ, गरिबी आणि श्रीमंती, गृहिणीची संसारदक्षता, बाजारहाट, बोहारीण, दुसऱ्याशीं वागण्याची रति, इत्यादि विविध विषयांच्या द्वारें वाचकांना पटवून दिलें आहे. या पुस्तकाला लेखकानें 'सुखी जीवनाच्या पाऊलवाटा' असें जें जोडनांव दिलें आहे, तें यथार्थ वाटतें. प्रत्येक महाराष्ट्रीय कुटुंबानें वाचलें पाहिजे अशा स्वरूपाचें हें बोधपर पुस्तक आहे. पृ. १६८. किं. २॥ रु.

(—चित्रमयजगत्, डिसेंबर, १९५३)

---

### अमेरिकन कामगारांची उत्पादनक्षमता

अमेरिकेंतील स्टॅनफर्ड रिसर्च इन्स्टिट्यूटनें अमेरिकन लष्कराच्या वतीनें प. युरोपांतील कामगार आणि अमेरिकन कामगार ह्यांच्या तौलनिक अर्थोत्पादनाचा एक आढावा तयार केला आहे. ह्या तपासणींत असें आढळून आलें कीं, अमेरिकन कामगार युरोपिअन कामगारांपेक्षा तीन पट अधिक उत्पादन करतो आणि त्याचे खरेदीशक्तीच्या रूपांतील वेतनहि तिप्पट असतें. तथापि ह्या सर्वसामान्य निष्कर्षाला अपवाद म्हणून दोन देशांचा निर्देश करण्यांत आला आहे. ते दोन देश म्हणजे ब्रिटन आणि स्वीडन. ह्या दोन देशांतील कामगार मात्र अमेरिकन कामगारांच्या निम्म्यानें उत्पादन करूं शकतात. फक्त प. युरोपपुरतेंच बोलावयाचें झाल्यास ह्या देशामधील कामगारांची अर्थोत्पादनक्षमता युरोपमध्यें सर्वांत अधिक आहे. दुसऱ्या टोंकाला स्पेन आणि इटली हे देश येतात. स्पेनमधील कामगारांचें सरासरी उत्पादन अमेरिकन कामगारांच्या उत्पादनाच्या अवघें एक सप्तमांश इतकेंच भरतें. इटलीमधील कामगार तर ह्याहीपेक्षा कमी म्हणजे एक पंचमांश एवढेंच उत्पादन करूं शकतो. काम आणि वेतन ह्यांच्यांतील प्रमाण पाहिलें तर मात्र अमेरिकेंतील प्रमाणापेक्षा तें फारसें कमी आहे, असें नाहीं. अमेरिकन कामगारांची उत्पादनक्षमता जास्त असण्याचें कारण आढाव्यांत नमूद करण्यांत आलें असून तें फारच उद्बोधक आहे. शास्त्रीय शोधांचा व्यावहारिक उपयोग करून घेणें आणि अशा प्रगत तंत्रविद्येचा औद्योगिक प्रश्न सोडविण्यासाठी अधिकाधिक उपयोग करून घेणें ह्या दोन्हीं बाबतींत अमेरिका युरोपच्या पुष्कळच पुढें आहे. त्यामुळें अमेरिकन कामगार आणि युरोपिअन कामगार ह्यांच्या उत्पादनक्षमतेंत एवढा फरक पडलेला आहे, असा अभिप्राय तपासणींत व्यक्त करण्यांत आला आहे.

# बँकांचें उत्पन्न व खर्च, १९५२

नोव्हेंबर, १९५१ मध्यें बँक रेट वाढविण्यांत आला, त्याच्या मागोमाग ठेवींवरील आणि दिलेल्या कर्जावरील व्याजाचे दरहि वाढले. रिझर्व्ह बँकेच्या "ओपन मार्केट" धोरणांतील बदलामुळें शेड्यूल्ड बँकांना रिझर्व्ह बँकेकडून मोठ्या प्रमाणावर कर्जें घ्यावीं लागलीं. ह्याचा परिणाम बँकांच्या उत्पन्नावर व खर्चावर झाला, तो १९५२ च्या आंकड्यांत स्पष्ट दिसून येतो.

आंकडे सादर केलेल्या सर्व बँकांचें मिळून उत्पन्न २½ कोटी रुपयांनीं वाढून तें ४९·७९ कोटी रुपये झालें. ह्याउलट, खर्चांत अधिकच वाढ होऊन तो ४ कोटींनीं ज्यास्त झाला आणि त्यामुळें निव्वळ नफा १९५१ चे मानानें १½ कोटी रुपयांनीं कमीच झाला. तो ११·६२ कोटी रुपये भरला.

हिंदी शेड्यूल्ड बँकांचें उत्पन्न वाढलें, तें मुख्यतः बिल्स व कर्जें ह्यांवरील उत्पन्नामुळें. एक्सचेंज बँकांचे बाबतींत ही प्रवृत्ति अधिकच स्पष्ट दिसून आली. ह्या उत्पन्नाच्या वाढीस (१) जास्त कर्जें, (२) कर्जावरील व्याजाचे चढीचे दर, किंवा (३) दोन्ही गोष्टी कारणीभूत होऊं शकतील. हिंदी शेड्यूल्ड बँकांनीं १९५१ चे मानानें १९५२ मध्यें कमीच कर्जें दिलेलीं होतीं तरी त्यांचें व्याजाचें उत्पन्न वाढलें ह्याचा अर्थ बँकांनीं व्याज भारी दरानें आकारलें हें स्पष्ट आहे. एक्सचेंज बँकांचें उत्पन्न वाढलें त्यास ज्यास्त कर्जें व चढीच्या व्याजाचा दर, हीं दोन्हीं कारणें घडलीं. हिंदी शेड्यूल्ड बँकांचा कर्जावरील व्याजाचा सरासरी दर ४·८% पडला, तर शेड्यूल्ड बँकांचा व्याजाचा दर ६·९% पडला. १९५१ मध्यें तत्सम आकडे ४·३% व ६·३% असे होते.

| | हिंदी शेड्यूल्ड बँका | | एक्सचेंज बँका | |
|---|---|---|---|---|
| | १९५१ | १९५२ | १९५१ | १९५२ |
| (अ) बिल्स व कर्जें (कोटी रु.) | ४२६ | ४२३ | १३९ | १४९ |
| (ब) मिळालेलें व्याज (कोटी रु) | १८ | २० | ९ | १० |
| (ब) चे (अ) शीं प्रमाण% | ४·३ | ४·८ | ६·३ | ६·९ |

१९५१ मध्यें शेड्यूल्ड बँकांच्या उत्पन्नापैकी तीन पंचमांश उत्पन्न दिलेलें व्याज आणि पगार ह्यांनीं मुरविलें; एक्सचेंज बँकांचे बाबतींत हें प्रमाण दोन पंचमांश असें होतें. १९५२ मध्यें खर्चाच्या ह्या दोन्ही बाबी वाढल्या, आणि त्यांतहि दिलेल्या व्याजाचें प्रमाण जास्तच वाढलें. हिंदी जॉइंट स्टॉक बँकांच्या बाबतींत व्याज आणि पगार ह्यांच्या एकूण रकमेचें एकूण उत्पन्नाशीं १९५१ मध्यें २३·६% प्रमाण पडलें तें १९५२ मध्यें २६·३% झालें. एक्सचेंज बँकांचीं तत्सम प्रमाणें अनुक्रमें १७·४% व २९·६% होतीं. त्यांच्या बाबतींत ठेवींवरील दिलेल्या व्याजाची रक्कम, तुलनेनें पहातां, बरीच ज्यास्त वाढली.

(आकडे लक्ष रुपयांचे)

| वर्ष | | उत्पन्न: बिल्स व कर्जें | उत्पन्न: इन्व्हेस्टमेंट | उत्पन्न: एकूण उत्पन्न | खर्च: पगार | खर्च: दिलेलें व्याज | खर्च: एकूण खर्च | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शेड्यूल्ड बँका | १९५१ | १८,१६·४ | ७,७३·५ | ३२,१८·० | ११,९८·६ | ७,५९·५ | २४,७७·१ | ७,५०·९ |
| | १९५२ | २०,२७·६ | ७,८९·२ | ३४,३८·२ | १२,८४·३ | ९,०६·१ | २६,९४·५ | ७,४३·७ |
| एक्सचेंज बँका | १९५१ | ८,८४·४ | १,२८·४ | १३,०६·५ | ३,४१·१ | २,२६·७ | ७,५२·४ | ५,५४·१ |
| | १९५२ | १०,३२·६ | १,२८·३ | १३,३०·५ | ३,६८·६ | ३,९५·० | ९,३४·६ | ३,९५·९ |
| सर्व बँका | १९५१ | २८,४१·८ | ९,३६·० | ४७,२७·५ | १५,९२·३ | १०,६६·१ | ३३,९९·७ | १३,२७·८ |
| | १९५२ | ३१,९१·८ | ९,७४·६ | ४९,७९·३ | १७,०७·४ | १३,८४·५ | ३८,१६·९ | ११,६२·४ |

## ताजमहाल होटेलची सुवर्ण ज्युबिली

मुंबई येथील ताजमहाल होटेल १६ डिसेंबर रोजीं सुवर्ण महोत्सव साजरा करणार आहे १९०३ मध्यें श्री. जे. एन्. टाटा ह्यांनीं हें होटेल बांधलें. होटेल नफ्यांत चालणें अशक्य आहे अशी त्यावेळीं सर्वांना भीति होती, ती सुदैवानें खोटी ठरली. श्री. टाटा ह्यांनीं होटेल बांधतांना नफा—तोट्यापेक्षा देशाभिमानास ज्यास्त महत्त्व दिलें व मुंबई शहरास हें पहिल्या प्रतीचें होटेल प्राप्त करून दिलें. वेळोवेळ होटेलमध्यें सुधारणा करण्यांत आल्या. सर्व देशांचे प्रवासी व व्यापारी ह्या होटेलमध्यें उतरतात व भारताचा पाहुणचार घेतात.

## इंग्लंडमध्यें जाणाऱ्या विद्यार्थ्यांना इशारा

ग्रेट ब्रिटनमध्यें अभ्यासासाठीं जाणाऱ्या कित्येक विद्यार्थ्यांचा असा समज असतो, कीं त्या देशांत नोकरी मिळणें सोपें आहे, व काम करून शिकता येणें तेथें शक्य आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें फावल्या वेळीं करतां येण्याजोगीं फारशी कामें मिळत नाहींत आणि सबंध वेळ काम करण्याची तयारी असली तरी अशीं कामें मिळणें कठीण असतें. म्हणून आपल्या खर्चाची भरपूर तरतूद केल्याविना विद्यार्थ्यांनीं तिकडे जाऊं नये, असा इशारा मुंबई सरकारनें दिला आहे.

## भाताचें जागतिक उत्पादन

१९५३—५४ मधील भाताचें जागतिक उत्पादन १९५२—५३ मधील उत्पादनापेक्षा थोडें ज्यास्तच भरेल. बर्मा, इंडोचायना व थायलंड हे भात उत्पादन करणारे आशियांतील प्रमुख देश आहेत. त्यांतील भाताचें उत्पादन ४२० कोटी पौंडांनीं वाढलें आहे.

# वारसा कर कायद्यांतील महत्त्वाच्या तरतुदी

[ " अर्थ "च्या गेल्या अंकांत वारसा कर कायद्याची व्याप्ति, करपात्र नसलेल्या मालमत्ता, एकत्रीकरण आणि मूल्यमापन आणि मालमत्तेच्या किंमतींत सूट ह्यासंबंधीं माहिती दिली होती. करमाफी, हिशोबपत्रकें, कराचा भरणा कोण करतो, अपील करण्याच्या तरतुदी, डिसचार्ज सर्टिफिकिटें, ह्यासंबंधीं माहिती येथें देण्यांत येत आहे. ]

### कर-माफी

पुढील मालमत्ता करमाफीस पात्र आहे, परंतु कर आकारणी-साठीं मालमत्तेच्या मुद्दली किंमतींत त्यांचा अंतर्भाव करण्यांत येतो.

( अ ) मरणापूर्वीं सहा महिन्यांत २५०० रुपयांपर्यंत किंमतीच्या सार्वजनिक धर्मादाय कारणासाठीं दिलेल्या देणग्या.

( आ ) मरणापूर्वीं दोन वर्षांच्या कालावधींत इतर कोणत्याहि हेतुसाठीं १५०० रुपयांपर्यंत दिलेल्या देणग्या.

( इ ) वारसा कर भरण्यासाठीं त्या कराच्या रकमेइतक्या, परंतु जास्तींत जास्त ५०,००० रुपयांच्या उतरविलेल्या व सरकारला वेचन करून दिलेल्या विमापत्राची रक्कम.

( ई ) वारसा कर भरण्यासाठीं त्या कराच्या रकमेइतकी, परंतु जास्तींत जास्त ५०,००० रुपयांपर्यंत सरकारकडे ठेवलेली रक्कम.

( उ ) मयत माणसाच्या विम्याची ५,००० रुपयांपर्यंतची रक्कम.

( ऊ ) मयत माणसावर सर्वस्वीं अवलंबून असणाऱ्या स्त्री नातेवाईकासाठीं, विवाहासाठीं म्हणून विमारूपानें, विश्वस्त निधी करून अगर ठरावपत्रानें ठेवलेली प्रत्येकी ५,००० रुपयांपर्यंतची रक्कम.

मुदली किंमतींत अंतर्भूत केलेल्या अशा सर्व बाबींच्या किंमतीवर सरकारी दरानें रिबेट मिळूं शकेल. हा या करमाफीचा परिणाम होय.

एकाच मिळकतीचे बाबतींत एक मागोमाग थोड्या अवधींत वारसांत बदल झाल्यास कांहीं सूट देण्यांत येईल. एकाच मालमत्तेचा अगर तिच्या कांहीं भागाचा वारसा पांच वर्षांत बदलल्यास, दुसरा मृत्यु १, २, ३, ४ अगर ५ व्या वर्षांत झाल्यास त्यानुसार कराची रक्कम अनुक्रमें ५०, ४०, ३०, २० अगर १० टक्क्यांनीं कमी करण्यांत येईल. इंग्लंडमध्यें केवळ जमीन आणि धंदा यापुरतीच ही सूट आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे.

तसेंच पहिल्या व्यक्तीच्या मरणामुळें वारसा कर भरल्यानंतर तीन महिन्यांत त्याच्या वारसास मृत्यु आल्यास, तो एकच मृत्यु मानण्यांत येईल. सांथीचे रोग वा अपघात यांमुळें लागोपाठ ओढवणाऱ्या मृत्यूसाठीं ही तरतूद आहे. हिंदु विधवा नवऱ्याच्या मृत्यूनंतर सात वर्षांत मरण पावल्यास तिच्या मर्यादित हक्कांत सूट देण्याचीहि तरतूद केली आहे.

भारतांतील कोणत्याहि राज्यांत दानपत्र ( प्रोबेट ), वारसापत्रें वा वारसा दाखले मिळविण्यासाठीं भरलेल्या कोर्ट-फीच्या रकमा वारसा कर आकारतांना वजा करण्यास पात्र आहेत. परंतु परस्पर देवघेवीचा व्यवहार नसलेल्या देशांत भरलेल्या कराच्या रकमेबाबत पाहतां त्या देशांत भरलेल्या कराची सर्व अगर मध्यवर्ती महसूल मंडळ ठरवील तितकी रक्कम त्या देशांतील मालमत्तेच्या किंमतींतून वजा करण्यांत येईल.

### हिशोबपत्रकें

प्राप्तिकर खात्याच्या अधिकाऱ्याकडून या कायद्याची अंमलबजावणी करण्यांत येईल. वारसा कराचे बाबतींत प्राप्तीकर कमिशनर हे कंट्रोलर व प्राप्तीकर अधिकारी असिस्टंट कंट्रोलर होतील. हे सर्व अधिकारी वारसा कर कायद्याखालील कंट्रोलरचीं कामें करतील परंतु प्रत्यक्ष कामाची विभागणी मयत इसमाच्या मालमत्तेच्या किंमतीनुसार ते आपसांत करतील. मयताच्या मृत्यू-पूर्वीच्या लगोलगच्या काळांत त्याच्या प्राप्तीवरील कराची आकारणी केलेल्या वा ज्यांनीं केली असती असे कमिशनर, इन्स्पेक्टिंग असिस्टंट कमिशनर आणि प्राप्तिकर अधिकारी त्या माणसानें मागें ठेवलेल्या मालमत्तेसाठीं वा वारसाकराचें कंट्रोलर म्हणून काम करतील.

कलकत्ता, मुंबई, मद्रास, कानपूर आणि दिल्ली यांसारख्या महत्त्वाच्या शहरांत, दिलेलीं विशिष्ट प्रकरणें हाताळण्यासाठीं खास वारसा-करविभाग सुरू करण्यांत येतील.

### कराचा भरणा कोण करतो ?

मयताची मालमत्ता ज्याचेकडे गेली आहे अगर ज्यास अधिकार मिळाले आहेत अगर मालमत्तेचा ताबा घेणारा असा इसम अगर मुखत्यार, अविभक्त हिंदु कुटुंबाचा प्रमुख, विश्वस्त व समिति ही मालमत्तेच्या मुदली किंमतीवरील सर्व वारसा-कर देण्यास पात्र ठरते परंतु असा कर भरण्याची जबाबदारी त्या इसमास प्रत्यक्ष मिळालेल्या अगर त्यानें दुर्लक्ष केलें नसतें तर मिळावयाच्या मालमत्तेच्या किंमतीपुरतीच मर्यादित असेल.

अशा करपात्र इसमानें आपणांस ठाऊक असलेल्या सर्व मालमत्तेचे तपासलेले हिशोब सहा महिन्यांच्या अवधींत कंट्रोलरकडे सादर करणें हें त्याचें कर्तव्य ठरतें.

मृत्यु झालेल्या दिनांकापासून वारसाकर लागू होत असून वारसास मिळालेल्या सर्व मिळकतीवर बसविण्यांत येतो. परंतु अशा कराचा भरणा कालांतरानें करण्यास परवानगी देण्याचा अधिकार कंट्रोलरला आहे तसेंच अशा इसमास जरूर तें तपासलेले हिशोबपत्रक, तपशील, दस्तऐवज, पुरावे इत्यादि सादर करण्यास सांगण्याचाहि कंट्रोलरला अधिकार आहे.

कराची अगर जादा कराची रक्कम निश्चित ठरविल्यानंतर, ती रक्कम, भरणा करण्याची मुदत व ठिकाण दर्शविणारें मागणीपत्रक अशा व्यक्तींकडे पाठविण्यांत येईल. अशा करपात्र इसमांची संख्या एकाहून अधिक असल्यास, कर भरण्याची जबाबदारी संयुक्तरीत्या व त्या प्रत्येकावर राहील, परंतु आपल्याकडे न आलेल्या मालमत्तेवरील कराची रक्कम भरलेल्या इसमास, अशा मिळकतीच्या मालक अगर विश्वस्ताकडून ती रक्कम वसूल करण्याचा त्यास अधिकार आहे.

### अपील करण्याच्या तरतुदी

कराबाबतचा दंड, कंट्रोलरनीं केलेली मिळकतीची किंमत, अगर डिसचार्ज सर्टिफिकिटें देण्यासाठीं त्यानें दिलेला नकार याविरुद्ध पहिलें अपील मध्यवर्ती महसूलमंडळाकडे आहे. हरकत घेतलेला हुकूम मिळाल्यापासून ९० दिवसांत अशीं अपिलें सादर करावींत. किंमतीसंबंधीचा तंटा असल्यास किंमती ठरविणाऱ्या लवादमंडळाकडे तो प्रश्न सोपविण्यांत येईल.

मंडळाच्या हुकुमामुळें उद्‌भवणाऱ्या कोणत्याहि कायद्याच्या प्रश्नाबाबत, असा हुकूम मिळाल्यापासून ९० दिवसांत मंडळाकडे अर्ज सादर करावा. मंडळास हा कायद्याचा प्रश्न हायकोर्टापुढें सोपवितां यावा म्हणून अर्जासोबत १०० रुपये फी असावी. मंडळाच्या निर्णयानें अर्जदाराचें समाधान न झाल्यास तो हायकोर्टाकडे अर्ज सादर करूं शकेल व हायकोर्ट तें प्रकरण सादर करण्यास मंडळाला सांगेल. मंडळानें हायकोर्टासमोर ठेवलेल्या प्रकरणांवरील हायकोर्टाच्या निकालावर सर्वोच्च न्यायालयाकडे अपील गुदरतां येईल; मात्र त्यासाठीं हें प्रकरण अपीलयोग्य असल्याचें हायकोर्टाचें प्रशस्तिपत्रक लागेल.

### डिस्‌चार्ज सर्टिफिकिटें

मयताच्या स्थावर मालमत्तेवर पहिला हक्क वारसा कराचा असून, मालमत्तेच्या मालकींतील बदल निरर्थक ठरेल अगर त्यावर कर लागू होईल. म्हणून मयताची मालमत्ता खरेदी करणाऱ्यानें ती विकणाऱ्याकडून त्या मालमत्तेवर वारसा कर भरला आहे अगर ती करपात्र नाहीं यापैकी असेल तें सर्टिफिकेट सादर करण्यास सांगितलें पाहिजे. ज्या बाबतींत वारसा कर भरावा लागत नसेल त्या बाबतींत डिस्‌चार्ज सर्टिफिकेटची वास्तविक गरज नाहीं. परंतु, सावधगिरी म्हणून खरेदीदार तें पाहण्यास मागेल, कारण त्याशिवाय त्यास निर्वेध मालकी मिळणार नाहीं. करमाफीचीं प्रशस्तीपत्रकें लागणारीं प्रकरणें बरींच असणार, म्हणून, अशीं प्रशस्तिपत्रकें मिळविण्यासाठीं कंट्रोलरकडे सादर करावयाच्या हिशेबाची साधी पद्धति शोधून काढण्यांत आली आहे.

सादर केलेला हिशेब बरोबर अगर एकूण मुद्दली किंमत माफीच्या मर्यादेपेक्षा अधिक नाहीं अशी कंट्रोलरची खात्री पटल्यावर तो सबंध मिळकतीचें अगर हिशेबांत दाखविलेल्या कोणत्याहि एका बाबीचें डिस्‌चार्ज सर्टिफिकेट देईल.

---

### अमेरिकन भांडवलाची परदेशांतील गुंतवणूक

अमेरिकेच्या अमेरिकेंतील गुंतवणुकींत गेल्या तीन वर्षांत ३२० कोटी डॉलर्सची भर पडून त्या गुंतवणुकीची रक्कम आतां १५०० कोटी डॉलर्सवर गेली आहे. ह्या गुंतवणुकीपैकी ७०% गुंतवणूक पश्चिम गोलार्धांत आहे. इतर महत्त्वाचे प्रदेश प. युरोप, मध्यपूर्व, फिलिपाइन्स, ऑस्ट्रेलिया आणि द. आफ्रिका हे आहेत. कारखानदारींत ह्या भांडवलापैकी मोठा भाग गुंतविलेला आहे; त्याचे खालोखाल तेलाचें उत्पादन येतें.

### माथेरानसाठी "रोपवे" ची योजना

माथेरानला उतारू वाहून नेणाऱ्या फनिक्युलर ट्राम्वे योजनेची प्राथमिक पहाणी करण्यासाठीं ब्रिटिश रोपवे इंजिनिअरिंग कंपनीचे तज्ज्ञ मुंबईस आले आहेत. ह्या रोपवे योजनेमुळें मुंबई ते माथेरान हा प्रवास दोन तासांत पुरा होईल. माथेरान येथें राहून मुंबईस कामासाठी जातां येईल. माथेरानच्या पायथ्याशीं मोटारींचे तबेले बांधण्यांत येतील. १९५४ अखेर रोपवेचें काम पुरें होईल अशी अपेक्षा आहे.

### अमेरिकन कामगार महिना ३६० रु. मिळवतो

अमेरिकेंतील कारखान्यामधील कामगारांच्या मासिक वेतनाची सरासरी ३६० रु. आहे. एक वर्षापूर्वीच्या मानानें ही रक्कम २५ रुपयांनीं अधिक आहे. जून १९५० च्या मानानें अमेरिकन कामगार आतां ९% ज्यास्त जिनसा विकत घेऊं शकतो. रहाणीचा दर्जा वाढूं शकला आहे. प्रत्येक कामगारास दर आठवड्यास सुमारें ४० तास काम पडतें.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ]  [ टेलिफोन नं. २४८३

मोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षे मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—यथायत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील,
B. A., LL. B., वकील
सांगली
चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले,
कोल्हापूर,
व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा,
B. Com., C. A. I. I. B.
मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.